नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७८ Issue - 178 | वार शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर २०२४ Blow- Friday Date 15 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### हिंदू राष्ट्र मान्य नसणाऱ्यांनी पाकिस्तानात चालते व्हावे

सोलापूर : आम्ही केवळ हिंदू राष्ट्र संकल्पाची भाषा बोलतो. हे राष्ट्र ज्यांना मान्य नाही, त्यांनी पाकिस्तानात चालते व्हावे. हवे तर त्यांना आम्ही



पाकिस्तानचे तिकीट काढून देऊ, असे वक्तव्य बागेश्वर धामाचे पीठाधीश पंडित धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांनी केले. विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर सोलापुरात होम मैदानावर पं. धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांच्या उपस्थितीत संत संमेलन झाले. त्यावेळी हजारोंच्या जनसमुदायासमोर बोलताना त्यांनी हिंदुराष्ट्र निर्मितीवर जोर दिला. महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर शाखा आणि श्री बागेश्वर धाम सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या संत संमेलनात धीरेंद्रकृष्ण शास्त्रींच्या भाषणातून विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हिंदू मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न दिसून आला. हिंदू राष्ट्र निर्माणासाठी देशभरात आता हिंदू जागा होत आहे. आजचा हिंदू पूर्वीचा डरपोक राहिला नाही. तर अन्याय आणि उपद्रव करणाऱ्या, धर्मविरोधकांना त्यांच्याच भाषेत प्रत्युत्तर देण्यासाठी पेटून उठल्याचे धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांनी सांगितले.

# बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न महायुतीच्या सरकारने पूर्ण केले


## छत्रपती संभाजी नगरमध्ये मोदींची टीका ; काँग्रेस नेहमीच आरक्षणाच्या विरोधात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी एका प्रचारसभेला संबोधित केलं. या सभेत ते म्हणाले, महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक यंदा ही यंदा दोन विचारधारांमधील लढाई आहे. या निवडणुकीत एका बाजूला छत्रपती संभाजी महाराजांना मानणारे देशभक्त उभे आहेत, तर दुसऱ्या बाजूला औरंगजेबाचं समर्थन करणाऱ्यांची टोळी आहे. काही लोक असे आहेत जे छत्रपती संभाजी महाराजांची हत्या करणाऱ्यांना आपला आदर्श मानतात. तर, आमच्या बाजूला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना मानणारे लोक आहेत. तुम्हाला (जनतेला) असं वाटत नाही की हे लोक महाराष्ट्राच्या अस्मितेविरोधात आहेत?

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी छत्रपती संभाजीनगरमधील जनतेला आठवण करून दिली की या जिल्ह्याचं नाव पूर्वी औरंगाबाद होतं. ते म्हणाले, या जिल्ह्याला छत्रपती संभाजी महाराजांचं नाव दिलं जावं अशी मागणी सर्वप्रथम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न आमच्या महायुतीच्या सरकारने पूर्ण केलं. राज्यात अडीच वर्षे महाविकास आघाडीचं सरकार होतं. उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मात्र, ते लोक बाळासाहेबांचं स्वप्न पूर्ण करू शकले नाहीत. मात्र महायुतीचं सरकार आल्यावर अवघ्या काही महिन्यांत आम्ही बाळासाहेबांची ती अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आम्ही या जिल्ह्याचं छत्रपती संभाजीनगर असं नामांतर केल्यानंतर काँग्रेस आणि महाविकास आघाडीला तो निर्णय खूप झोंबला. त्यांचे काही सहकारी न्यायालयात देखील गेले. त्यांनी आमच्या या निर्णयाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने नेहमीच सत्ता मिळवण्यासाठी समाजा-समाजांचं विभाजन करण्याचा प्रयत्न केला आहे. विकासाऐवजी फोडा आणि राज्य करा ही त्यांची नीती राहिली आहे.



नरेंद्र मोदी यांनी यावेळी काँग्रेसवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, काँग्रेस नेहमीच आरक्षणाच्या विरोधात राहिली आहे. देशाचा विकास त्यांना नेहमीच खूपत आला आहे. समाजांमध्ये फूट टाकणे आणि सत्ता काबीज करणे हेच त्यांचं आजवरचं धोरण राहिलं आहे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गांमधील समाजांना फोडण्याचं षडयंत्र काँग्रेसने रचलं आहे. परंतु, आम्ही त्यांना यामध्ये यशस्वी होऊ देणार नाही.

पंतप्रधान म्हणाले, देशाला गेल्या १० वर्षांपासून ओबीसी पंतप्रधान लाभला आहे. मात्र हेच काँग्रेसला खुपतंय. काँग्रेसचे नेते परदेशांमध्ये जातात आणि खुलेआम घोषणा देतात की आम्ही आरक्षण संपवून टाकू. आता ते महाविकास आघाडीतील पक्ष महाराष्ट्रातील छोट्या छोट्या जातींमध्ये फूट पाडण्याचं काम करत आहेत. जेणेकरून त्या छोट्या जातींची, समुदायांची राजकीय शक्ती कमी व्हावी आणि ठराविक लोकांनाच सत्तेचा मलिदा मिळावा.

# संजय राऊतांमुळे राज्यातील आघाडीचे सरकार गेले

### विश्वजित कदम यांची टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली : संजय राऊत यांच्या अंगात आले आणि आमचे सरकार आले, मात्र राऊतांच्या अंगात आलेल उतरलेच नाही. त्यामुळे आमचे महाविकास आघाडीचे सरकार गेले या शब्दात काँग्रेसचे आ. डॉ. विश्वजित कदम यांनी कडेगाव तालक्यातील प्रचार सभेत बोलताना राऊत यांच्यावर खोचक टीका केली. लोकसभा निवडणुकीवेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेस पक्षादरम्यान सांगली लोकसभा मतदारसंघावरून टोकाचे मतभेद झाले होते. त्या निवडणुकीत काँग्रेसचे विशाल पाटील यांनी बंडखोरी करत आघाडीचे अधिकृत शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) उमेदवाराचा पराभव केला होता. या निवडणुकीत डॉ. कदम आणि ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात आरोप प्रत्यारोप झाले होते. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीत देखील डॉ. कदम यांनी पुन्हा एकदा राऊत यांच्यावर हल्ला चढवत महाविकास आघाडीचे सरकार जाण्यास त्यांना जबाबदार धरले आहे. यामुळे या दोन पक्ष आणि नेत्यांमधील कलगीतुरा आता विधानसभेला सुरू झाला आहे.

# निवडणूक गैरप्रकारासाठी १२५ कोटी रुपयांचा वापर 'ईडी'ने महाराष्ट्रातील २४ ठिकाणी छापे टाकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मालेगाव येथील एका व्यापाऱ्याने निवडणुकीतील गैरप्रकारांसाठी पैशांचा गैरवापर केल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) बुधवारी ठाणे, वाशी, मालेगाव, नाशिक, सूरत आणि अहमदाबादमध्ये व्यापारी आणि बनावट कंपन्यांशी संबंधित २४ ठिकाणी छापे टाकले. या प्रकरणात बँक खाती आणि १२५ कोटी रुपयांचा गैरवापर वापर केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी ईडी अधिक तपास करीत आहे.




सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मालेगाव येथील सिराज अहमद हॅरुन मेमनने एकापेक्षा जास्त बँक खाती उघडल्याशी संबंधित छापे टाकण्यात आले आहेत. मेमनला स्थानिक पोलिसांनी अटक केली होती. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी गुरुवारी सकाळी या प्रकरणाला 'वोट जिहाद फंडिंग' गैरव्यवयहार असे म्हटले आहे. तसेच या बेनामी बँक खात्यांमधून पैसे काढून निवडणुकीत गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. सोमय्या यांनी मालेगाव पोलिसांकडे या आरोपांसाठी तक्रार केली आहे. सिराज मोहम्मदच्या २४ बेनामी बँक खात्यांसह मालेगाव, नाशिक येथील दोन बँकांमध्ये पोलीस, ईडी, प्राप्तिकर विभाग, आरबीआय, निवडणूक आयोग तपास करीत आहेत, असे त्यांनी 'एक्स' या समाज माध्यांवर पोस्ट करण्यात आले आहे.

मालेगाव पोलिसांनी ७ नोव्हेंबर रोजी सिराज विरोधात दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने कारवाई सुरू केली आहे. मालेगावमधील ११ स्थानिकांनी केलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सिराजवर गंभीर आरोप असून त्याला अटकही करण्यात आली आहे. सिराज बँक खात्यांचा वापर निवडणुकीसाठी करीत असल्याचा आरोप आहे. सिराजने मालेगावमधील नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अनेक बँक खाती उघडली होती. यामध्ये नागरिकांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून त्यांनी शेतकऱ्यांना पैसे पाठवण्यासाठी नवा व्यवसाय सुरू करत असल्याचे भासवले होते.

सिराजने त्याने कृषी व्यवसायासाठी बँक खाती उघडण्यासाठी समजावले होते. त्याबदल्यात त्याने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम देण्याचे आश्वासन दिले होते, असे तक्रारदार जयेश मिसाळ यांनी पोलिसांना सांगितले. सिराजने मिसाळ यांच्याप्रमाणेत इतर ११ जणांची बँकेत खाती उघडली होती. या खात्यांमध्ये कोट्यवधी रुपये जमा झाल्याचे आणि ते अन्य खात्यात वळविण्यात येत असल्याचे नंतर मिसाळ आणि अन्य खातेदारांच्या लक्षात आले. या प्रकाराचा मिसाळ आणि इतर खाताधारकांना धक्का बसला. त्यांनी याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली. सिराजने आपल्या बँक खात्यांचा गैरवापर करून त्यात बेकायदेशीरपणे पैसे हस्तांतरित केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

गेल्या दोन महिन्यांत दहा ते बारा बँक खाती उघडण्यात आली होती. 'ईडी'ने या खात्यांमधील व्यवहारांची माहिती घेतली, तेव्हा त्यात १२५ कोटी रुपयांचे व्यवहार आढळले. निवडणुकीसाठी या रकमेचा वापर होत असल्याचा आरोप असून याबाबत 'ईडी' तपास करीत आहे.

# ७० हजार कोटींचा घोटाळा करूनही अजित पवार यांना भाजपाने उपमुख्यमंत्री केले : खा.ओमराजे निंबाळकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ मानेगाव येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी बोलताना खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले की; पंतप्रधानांनी अजितदादांना कारवाई करण्याचा इशारा दिला होता. मात्र त्यांनी सरकारला पाठिंबा दिल्यानंतर त्यांना थेट उपमुख्यमंत्री करून अर्थ खाते देण्यात आलं. ७० हजार कोटींचा घोटाळा करणाऱ्या अजितदादांना जर पंतप्रधान कारवाई करणार असे म्हणत असताना त्यांना उपमुख्यमंत्री करत असतील तर कोणावर विश्वास ठेवायचा असा सवाल उपस्थित करत त्यांनी भाजपा सदबुद्धीने कारवाई करत आहे. पक्ष फोडीचे राजकारण केले. मराठा समाज शांततेत आंदोलन करत असताना लाठी चार्ज केला. आता ते म्हणतात बटेंगे तो कटेंगे याला माझे एकच उत्तर आहे. जुडेंगे तो जितेंगे असे म्हणत त्यांनी मोदी पंतप्रधान असताना हिंदू खतरे मे कसा असावा उपस्थित केला. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना जीएसटी लावला जातो. मात्र धन दांडग्यांना सूट दिली जाते. शेतमालाला भाव मिळत नाही असा सवाल उपस्थित केला.

**राजाभाऊ चवरे,कुर्मदास कारखान्याचे माजी संचालक हिंदुराव आरे, अमरसिंह साठे व जामगावचे सरपंच सोनाली सरवदे, बुद्रुकवाडीचे सरपंच पूजा माने यांनी जाहीर प्रवेश करून पाठिंबा दिला.**

यावेळी त्यांनी मतदार उमेदवारांची तुलना करत असतो दडपशाहीचे राजकारण लोकांना मान्य नसते राजकारणात कामाची स्पर्धा महत्त्वाची असते त्याच पद्धतीने अभिजीत पाटील यांनी विठ्ठल कारखाना शेवटच्या घटका मजत असताना तो चांगल्या पद्धतीने सुरू करून शेतकऱ्यांना चांगला दर दिला. कोरोनाच्या महामारीत आर्थिक नुकसान करून नागरिकांचा जीव वाचवला हीच पुण्याई त्यांना निवडून देईल असा विश्वास व्यक्त केला.

**भाजपचे उमेदवार समाधान आवताडे यांच्या प्रचारार्थ सभा**

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन**

# पंढरपूर मंगळवेढ्याचा विकास करायचा असेल समाधान अवताडे यांना मतदान करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा सर्वांगीण विकास करण्यासाठी समाधान आवताडे यांच्या रूपाने तुम्हाला लोकप्रिय आमदार मिळाला आहे.

आजवर त्यांनी मतदारसंघात मोठा विकास घडवून आणला आहे व तेथील मतदारांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावी त्यांच्या कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून त्यांना मोठे मताधिक्य देऊन विधानसभेत पाठवले असे आव्हान केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी केले आहे.

केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीनजी गडकरी यांनी गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा येथे जाहीर सभा पार पडली व भाजपचे उमेदवार समाधान आवताडे यांच्या प्रचारासाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती या प्रचार समिती बोलत होती यावेळी व्यासपीठावर उमेदवार समाधान आवताडे माजी आ. प्रशांत परिचारक यांच्यासह माहितीतील इतर नेतेमंडळी व मान्यवर उपस्थित होते.




यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की बारा दहा गाव आणि उदानी बनवलेला देश आहे मागील ७५ वर्षात येतील खेडे रस्त्या वाचून अडविळीत पडली होती पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी ती गोष्ट खटकताच होती त्यांनी त्यावेळी सांगितले की प्रत्येक छोटे छोटे गाव छोटा रस्त्याने जोडण्याचा आराखडा बनवा यावर तीन महिने परिश्रम घेऊन आराखडा बनवण्यात आला आणि पंतप्रधान ग्रामसडक आवास योजना अस्तित्वात आले आणि योजनेतून हजारो खेडेगावातील रस्त्याने जोडण्यात आले.

मागील दहा वर्षाच्या काळात राज्यात मोठ्या राष्ट्राचे जाळे झाले हे पंढरपूर आणि मंगळवेढा शहरापर्यंत रस्ते पोचले आहेत विकासासाठी देशात पैशाची कमी नाही.

बुद्धमशील नेतृत्वाची गरज आहे आ. समाधान अवताडे यांनी अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये तालुक्यातील मोठे काम केलेले आहे म्हैसाळ योजनेचे काही दिवसात मूर्त स्वरूपात येणार आहे या भागाचा योजनेमुळे कायापालट होणार आहे एमआयडीसी आणि हजारो कोटी रुपयांची विकास कामे या ठिकाणी सुरू आहेत आमदार समाधान आवताडे यांच्या रूपाने काम करणारे आमदार आपल्याला मिळाला आहे येथील मतदारांनी ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहावे आणि येत्या २० तारखेला कमळ या चिन्हावरील समोरील बटन दाबून त्यांना भरघोस मतांनी विजयी करा असे आव्हान त्यांनी केले.

**सोलापूर जिल्ह्यातील १६ हजार कोटीची कामे पूर्णत्वाकडे**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बोलताना सांगितले की मागील काही महिन्यापूर्वी मी सोलापूर येथील कार्यक्रमात विकास कामाची घोषणा केली होती ही कामे १६००० कोटी रुपये होते यावेळी उपस्थित नागरिकांनी तोंडावर मोठे घातली होती आता मला सांगण्यास आनंद होतो की यापैकी अनेक काम पूर्ण झाले असून काही कामे पूर्णत्वास मार्गावर आहेत १६००० कोटी रुपयांपैकी १५००० कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली आहेत.

### आ. परिचारक यांचे केंद्रीय वाहतूक मंत्री गडकरी यांनी केले कौतुक

**सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार परिचारक हे ही विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक होते परंतु भाजपकडून अवताडे यांना उमेदवारी देण्यात आली भाजपचे वरिष्ठ नेत्यांकडून परिचारक यांची समजूत घालण्यात आली. त्यामुळे परिचारक यांनी माघार घेत, आ समाधान आवताडे यांचा प्रचार सुरू केला व केंद्रीय नितीन गडकरी यांनी त्यांच्या नावाचा उल्लेख त्यांनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखवून समाधान आवताडे यांना पाठिंबा दिला त्यामुळे त्यांचे आभारही त्यांनी मानले.**

संपादकीय....

## गैरव्यवहारावर ईडीची कारवाई

मालेगाव येथील सिराज अहमद हॅरुन मेमनने एकापेक्षा जास्त बँक खाती उघडल्याशी संबंधित छापे टाकण्यात आले आहेत. मेमनला स्थानिक पोलिसांनी अटक केली होती. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी गुरुवारी सकाळी या प्रकरणाला 'वोट जिहाद फंडिंग' गैरव्यवयहार असे म्हटले आहे. तसेच या बेनामी बँक खात्यांमधून पैसे काढून निवडणुकीत गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. सोमय्या यांनी मालेगाव पोलिसांकडे या आरोपांसाठी तक्रार केली आहे. सिराज मोहम्मदच्या २४ बेनामी बँक खात्यांसह मालेगाव, नाशिक येथील दोन बँकांमध्ये पोलीस, ईडी, प्राप्तिकर विभाग, आरबीआय, निवडणूक आयोग तपास करीत आहेत, असे त्यांनी 'एक्स' या समाज माध्यांवर पोस्ट करण्यात आले आहे. मालेगाव पोलिसांनी ७ नोव्हेंबर रोजी सिराज विरोधात दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने कारवाई सुरू केली आहे. मालेगावमधील ११ स्थानिकांनी केलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सिराजवर गंभीर आरोप असून त्याला अटकही करण्यात आली आहे. सिराज बँक खात्यांचा वापर निवडणुकीसाठी करीत असल्याचा आरोप आहे. सिराजने मालेगावमधील नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अनेक बँक खाती उघडली होती. यामध्ये नागरिकांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून त्यांनी शेतकऱ्यांना पैसे पाठवण्यासाठी नवा व्यवसाय सुरू करत असल्याचे भासवले होते. सिराजने त्याने कृषी व्यवसायासाठी बँक खाती उघडण्यासाठी समजावले होते. त्याबदल्यात त्याने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम देण्याचे आश्वासन दिले होते, असे तक्रारदार जयेश मिसाळ यांनी पोलिसांना सांगितले. सिराजने मिसाळ यांच्याप्रमाणेत इतर ११ जणांची बँकेत खाती उघडली होती. या खात्यांमध्ये कोट्यवधी रुपये जमा झाल्याचे आणि ते अन्य खात्यात वळविण्यात येत असल्याचे नंतर मिसाळ आणि अन्य खातेदारांच्या लक्षात आले. या प्रकाराचा मिसाळ आणि इतर खातेधारकांना धक्का बसला. त्यांनी याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली. सिराजने आपल्या बँक खात्यांचा गैरवापर करून त्यात बेकायदेशीरपणे पैसे हस्तांतरित केल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे. गेल्या दोन महिन्यांत दहा ते बारा बँक खाती उघडण्यात आली होती. 'ईडी'ने या खात्यांमधील व्यवहारांची माहिती घेतली, तेव्हा त्यात १२५ कोटी रुपयांचे व्यवहार आढळले.

# मधुमेह असाध्य आजार, निगा राखा !

मधुमेह या आजाराबद्दल जनजागृती करण्यासाठी १४ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मधुमेह दिवस म्हणून जगभराममध्ये साजरा केला जातो. जागतिक मधुमेह दिनाची स्थापना आंतरराष्ट्रीय मधुमेह प्राधिकरण या संस्थेद्वारे १९९१ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने ही संकल्पना राबविण्यात आली आणि २००६ मध्ये युएन ठराव ६१/२२५ अंतर्गत अधिकृत संयुक्त राष्ट्र दिवस बनला. १४ नोव्हेंबर हा दिवस १९२२ मध्ये चार्ल्स बेस्टसह इन्सुलिनचे सह-शोधक सर फ्रेडरिक बँटिंग यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ निवडण्यात आला. सर बँटिंग यांच्या शंभराव्या जन्म दिनादिवशी जागतिक मधुमेह दिवस या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

नीलवलय हे जागतिक मधुमेह दिवसाचे संबोधचिन्ह म्हणून ठरवण्यात आले. मधुमेह या आजाराविरुद्ध सामाजिक मोहिमेमध्ये सर्वांनी एकत्रितपणे सहभागी होणे, या संदेशाचे हे चिन्ह द्योतक आहे. मधुमेह हा चयापचयसंबंधित विकार आहे. हा चिरकालीन आजार आहे म्हणजेच हळू-हळू विकसित होतो. यामध्ये रक्तातील शर्करेमध्ये आवश्यकतेपेक्षा अधिक वाढ दिसून येते. जागतिक मधुमेह दिनानिमित्त आयोजित मोहिमा ब्लू सर्कल लोगोने दर्शविल्या जातात, जे २००७ मध्ये संयुक्त राष्ट्राने अधिकृतपणे मान्यता दिल्यानंतर लगेचच प्रेरित केले गेले होते आणि तेव्हापासून ब्लू सर्कल हे मधुमेह जागरूकतेचे जागतिक प्रतीक मानले जाते आणि सूचित करते. मधुमेहाच्या वाढत्या प्रकरणांचा सामना करण्यासाठी जागतिक मधुमेह समुदायांची युती.

मधुमेह प्रकार-१ हा प्रामुख्याने अल्पवयीन गटातील व्यक्तींमध्ये दिसून येतो. यामध्ये इन्शुलीनच्या उत्पादनात घट दिसून येते. प्रकार-१ हा प्रतिबंधात्मक नाही, परंतु अंतःक्षेपणाद्वारे त्याचे नियंत्रण करता येते. तर मधुमेह प्रकार-२ मध्ये स्वादुपिंडाद्वारे तयार झालेले इन्शुलीन शरीरातील पेशींद्वारे योग्य प्रमाणात वापरले जात नाही. दीर्घकालीन मधुमेहामुळे अंधत्व, वृक्क निष्क्रियता, हृदय विकार असे आजार उद्भवण्याची शक्यता असते. संतुलित आहार, नियमित शारीरिक व्यायाम, नियंत्रित वजन आणि धूम्रपान निषेध यांद्वारे मधुमेह या आजाराला प्रतिबंध घालता येतो.

जागतिक मधुमेह दिवसाचा प्रसार करण्यासाठी सार्वजनिक कार्यक्रम आणि मधुमेह तपासणी शिबिर यांचे आयोजन केले जाते. तसेच विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. निळ्या रंगाचे कपडे परिधान करून मिरवणूक किंवा सामूहिक व्यायामांचे आयोजन केले जाते. जागतिक मधुमेह दिवसानिमित्त रूपरेखा आखल्या जातात, त्यांपैकी काही महत्त्वाच्या रूपरेखा जसे, सुरक्षित भविष्य : मधुमेहसंबंधी शिक्षण आणि प्रतिबंध (२०१३); आरोग्यपूर्ण आहार (२०१५); स्त्रिया आणि मधुमेह : आरोग्यपूर्ण भविष्य, आपला अधिकार (२०१७); कुटुंब आणि मधुमेह (२०१८-१९). आंतरराष्ट्रीय मधुमेह प्राधिकरणाने २०२० सालाकरिता 'परिचारिका आणि मधुमेह' ही रूपरेखा ठरवली आहे. यानुसार मधुमेहग्रस्त व्यक्तींच्या देखभालीमध्ये परिचारिकांच्या भूमिकेबद्दल जागृती करण्यात येणार आहे.

यावर्षी जागतिक मधुमेह दिनाची थीम आहे ब्रेकिंग बॅरियर्स, ब्रिजिंग गॅप्स. ही थीम मधुमेहाचा लोकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकते. हे प्रभावी मधुमेह व्यवस्थापनाचे महत्त्व आणि ते लोकांच्या जीवनाची गुणवत्ता कशी सुधारू शकते यावर देखील जोर देते. डब्ल्यूएचओ आणि इतर संस्थेच्या एकत्रित प्रयत्नांना साध्य करण्यासाठी मधुमेह शिक्षण वाढविण्यासाठी चांगल्या संधी, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य सुलभ करण्यासाठी लोकांना त्यांच्या सार्वजनिक आरोग्य सेवा संस्था आणि इतर जागतिक संस्थांना आग्रह करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी या विषयाचा हेतू देखील आहे. २०३० पर्यंत मधुमेह कव्हरेजचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी, मधुमेहाने ग्रस्त ८०% लोकांचे निदान, निदान झालेल्या ८०% लोकांचे ग्लायसेमिया आणि रक्तदाब यावर चांगले व्यवस्थापन असावे, ६०% लोकांकडे (४० वर्षे आणि त्याहून अधिक) स्टॅटिन (रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यास मदत करणाऱ्या औषधांचा गट) उपलब्ध असणे आवश्यक आहे. १००% टाईप १ डायबिटीज बाधित लोकांना इन्सुलिन आणि योग्य रक्तातील ग्लुकोज स्व-व्यवस्थापन सुविधा सहज उपलब्ध असावी, हे समाविष्ट आहे.

इंटरनॅशनल डायबिटीज फाऊंडेशनच्या मते असा अंदाज आहे की सुमारे ५४.१ कोटी प्रौढांना टाईप २ मधुमेह होण्याचा धोका आहे, जे त्यांना शिक्षित करण्यासाठी जागरूकता कार्यक्रम आणि गुणवत्तापूर्ण मधुमेह शैक्षणिक प्लॅटफॉर्मचा प्रचार करून धोका कमी करण्यासाठी जगभरातील सर्वात चिंतेचा विषय बनला आहे. मधुमेहाचे प्राथमिक अवस्थेत व्यवस्थापन आणि प्रतिबंध करण्यासाठी. योग्य जीवनशैलीच्या सवयी, आहाराचे योग्य व्यवस्थापन (ग्लायसेमिक इंडेक्स ५० पेक्षा कमी किंवा त्यापेक्षा कमी असलेला आहार) याने टाइप २ मधुमेह टाळता येतो आणि त्याचे व्यवस्थापन करता येते. टाइप २ मधुमेह ही एक अशी स्थिती आहे जिथे इन्सुलिन पुरेशा प्रमाणात तयार होत नाही आणि कार्यक्षमतेने वापरले जात नाही (ज्याला इन्सुलिन प्रतिरोध देखील म्हणतात), जी शिस्तबद्ध जीवनशैली, स्वतःचे निरीक्षण आणि रक्तातील साखरेच्या चढउतारांवर लक्ष ठेवून, डॉक्टरांशी नियमित सल्लाम सलत करून पुनर्संचयित केली जाऊ शकते.

मधुमेह नियंत्रित करण्यासाठी असे काही प्रतिबंधात्मक टिप्स आहेत. जसे साखर आणि परिष्कृत कार्बोहायड्रेट्सचे सेवन टाळावे, एका वेळी जेवणाचा थोडासा भाग खाण्याचा सराव करावे, ग्लायसेमिक इंडेक्स कमी असलेले फायबर आणि अन्न समाविष्ट करावे, धूम्रपान सोडा ज्यामुळे इन्सुलिन प्रतिरोधक शक्ती वाढते, दिवसातून किमान ३० मिनिटे नियमित व्यायाम करण्याची सवय लावावे, तुमच्या रक्तातील कोलेस्टेरॉलच्या पातळीवर लक्ष ठेवा (आदर्श २०० च्या खाली असावे). एलडीएल (लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन) १०० च्या खाली, एचडीएल (हाय-डेन्सिटी लिपोप्रोटीन) २० च्या वर आणि ट्रायग्लिसराइड्स १५० च्या खाली, तुमच्या रक्तदाबाचे योग्य व्यवस्थापन करा जे १३०/८० किंवा त्याहून कमी असावे, एरेटेड पेये आणि साखरेसह इतर पेये घेणे टाळावे ज्यामुळे टाइप २ मधुमेहाचा धोका वाढू शकतो, सामान्य पाणी पिण्याची सवय लावावी, मधुमेह नियंत्रण प्रतिबंधात्मक टिपांसह अद्यतनित व्हावे, गरजूंपर्यंत जनजागृती करण्यासाठी मधुमेहाशी संबंधित मोहिमेचा प्रचार आणि प्रोत्साहन द्यावे.

मधुमेह असलेल्या लाखो लोकांना त्यांच्या घरी, कामावर आणि शाळेत त्यांची स्थिती व्यवस्थापित करण्यासाठी दररोज आव्हानांचा सामना करावा लागतो. ते लवचिक, संघटित आणि जबाबदार असले पाहिजेत, ज्यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. मधुमेहाची काळजी बहुतेकदा फक्त रक्तातील साखरेवर केंद्रित असते, ज्यामुळे अनेकांना भारावून टाकले जाते. हा जागतिक मधुमेह दिन, मधुमेह काळजीच्या केंद्रस्थानी निरोगीपणा ठेवू या आणि मधुमेहाच्या चांगल्या जीवनासाठी बदल सुरू करू या.

**– प्रविण बागडे**
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagde@gmail.com

## उधाण...

आता उधाण येण्यास
सुरवात होईल बा भीमा
तुझ्या आठवणीना...
इतक्या दिवस झोपलेल्या
तुझ्या कार्यकर्त्यांना, मग
झोपच नाही लागाची
त्यांच पापण्यांना .......

शांत, निद्रास्थ, निवांत
राहिलेले, तुझे कार्यकर्ते
बा भीमा
आता जोशात उठतील...
तुझा महपरिनिर्वाण आला ,
जयंती आली म्हणून जोराने
बोंबा मारतील.....

इतके दिवस झाले होते
बा भीमा
पहा कसं ते सुन्न
आता तुझा कार्यक्रम
होत नाही तो पर्यत
धावत राहतील ,इकडे तिकडे
न थकता, ठेवून मन प्रसन्न...

महापरिनिर्वाण झालं,
जयंती झाली , थोडी
फार बुद्ध पौर्णिमा
झाली कि मग परत
बेडका प्रमाणे
होतील निद्रस्थ,
मग कोणाशी घेणं नाही
कि देणं नाही, नको मग आंबेडकरी
विचार, बुद्ध विचार,
राहतील ते त्यांच्याच धुंदीत सुस्थ ....

फक्त महपरिनिर्वाण,
जयंती साठीच बाबासाहेब
यांची नको आठवण...
कार्यकर्त्यानो त्यांच्या
विचारांचा दररोज करून
प्रचार प्रसार, मनामनात
ठेवा करून साठवण....

**– संघरत्न घनघाव**
**९०४९०७४१८४.**

# सिंदखेडराजा मधील मतदान यंत्र सिलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/राहुल साबळे : मा. भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १२ नोव्हेंबर आणि १३ नोव्हेंबर २०२४ रोजी ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करण्याचे काम आज संपन्न झाले.




२४ सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने आपल्या सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये एकूण ३४० मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ३४० मतदान यंत्र (उण) सिलिंग करण्यात आले, ३४० मतदान केंद्राकरिता एकूण ६८० बॅलेट युनिट (इण) सिलिंग करण्यात आले तसेच ३४० व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करून सज्ज करण्यात आले.

त्याचप्रमाणे प्रत्यक्ष मतदानादिवशी काही अडचण उद्भवल्यास राखीव मध्ये ६५ मतदान यंत्र (उण), १३० बॅलेट युनिट (इण), ६५ व्ही. व्ही. पॅट मशीन सिलिंग करून सज्ज करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे एकूण मतदान यंत्रापैकी २० मतदान यंत्रावर प्रारूप स्वरूपात १००० प्रमाणे मतदान नोंदवून मतदान यंत्र सुस्थितीत असून मतदान प्रक्रियेसाठी सज्ज असल्याची खातरजमा करण्यात आली. सर्वच मतदान यंत्रावरती प्रारूप मतदान घेतल्यानंतर ते सुस्थितीत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतरच मतदान यंत्र सिलिंग करण्यात आले आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ साठी सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये एकूण ३४० मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ३० सिलिंग टीम पुढील २ दिवस म्हणजेच १२ नोव्हेंबर आणि १३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण करणार आहेत. प्रत्येक टीम मध्ये एक झोनल अधिकारी, एक सहाय्यक झोनल अधिकारी, एक ग्राम महसूल अधिकारी, एक महसूल सेवक असे एकूण ४ कर्मचारी -अधिकारी काम करत आहेत त्यातील टीम क्रमांक १४ मध्ये झोनल अधिकारी विजय माईनकर, सहायक झोनल अधिकारी श्रीकांत बुलबुले, ग्राम महसूल अधिकारी विष्णू थोरात, आकाश माघाडे महसूल सहायक हे चार अधिकारी कर्मचारी काम करत आहेत.

कालपासून सुरु असलेल्या या ई.व्ही.एम. आणि व्ही. व्ही. पॅट मशीनचे सिलिंगचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी मा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीम युद्धपातळीवर काम करत आहे आणि ई. व्ही. एम. आणि व्ही. व्ही. पॅट सिलिंग ची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मेहनत घेत आहेत . त्यासाठी मा. तहसीलदार सिंदखेडराजा श्री. अजित दिवटे , मा. तहसीलदार देऊळगाव राजा श्रीमती वैशाली डोंगरजाळ, मा. गट विकास अधिकारी सिंदखेड राजा श्री मुकेश माहोर, मा. मुख्याधिकारी सिंदखेड राजा श्री प्रशांत व्हटकर, मा. निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री. मनोज सातव, मा.निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा श्री प्रवीण घोटकर, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ.अस्मा मुजावर ,मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ. प्रवीणकुमार वराडे, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, मा. नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, मा.प्र. नायब तहसीलदार श्री. नितीन बढे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी श्री. अंकुश म्हस्के, नोडल अधिकारी श्री सचिन पांचाळ तसेच सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग यांनी सिलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी खूप मेहनत घेतली.

# उमेदवार ॲड. रोहित मोरे यांच्या प्रचाराला वेग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : ॲड. रोहित मोरे ट्रंम्पेट चिन्हाला सोलापूर शहर विधानसभा निवडणुक २०२४ साठी मतदारांचा भरघोस पाठिंबा मिळत आहे. सोलापूर शहर मध्ये सोशल साइट्स फेसबुक, व्हाट्सअप या आधुनिक तंत्रज्ञान सामाजिक वेब साईट चे माध्यमातून नुकत्याच झालेल्या सभेला फेसबुक माध्यमातून १.२५ लाख व्ह्यूज मिळाले आहेत. ॲड. रोहित मोरे यांना सोलापूर सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध असल्याची भावना व्यक्त करत आहेत.




मतदारांना एक नवा आशावाद दिसत आहे. प्रचार सभेत प्रमुख उपस्थिती श्री विजय कुंदन जाधव (अध्यक्ष गिरीकर्णिका फाउंडेशन), श्री योगिनी गुर्जर (वस्त्रोद्योग उद्योगपती ), श्री वासुदेव आडकी (वस्त्रोद्योग उद्योगपती), श्री अर्जुन रामगिर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना म्हणाले की, नियमित पाणी पुरवठा, महागाई बेरोजगारी कमी करणे, आय टी हब उभारणीच्या,मेगा टेक्सटाइल पार्क उभा करणे, युवकांना रोजगार संधी उपलब्ध करणे, उद्योग विभाग चालना देणे इत्यादी.

सोलापूर विकास साठी काम करणार असल्याचे सांगितले.

# आरक्षणासाठी ५० टक्के मर्यादा तोडू! नांदेडमधील सभेत राहुल गांधींकडून मोदी लक्ष्य

नांदेड : एकूण लोकसंख्येत ज्या समाजघटकाचे जेवढे प्रमाण त्यानुसार वाटा ठरला पाहिजे. अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी, अल्पसंख्याक यांचे प्रमाण ९० टक्के असेल तर आरक्षण तेवढे का नको? असा प्रश्न उपस्थित करून संसदेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी आमचे सरकार आल्यास ५० टक्क्यांची ही मर्यादा आम्ही काढून टाकू, असे आश्वासन देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य केले. शहरातील नवा मोंढा मैदानावर गुरुवारी नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व नऊ विधानसभा मतदारसंघांतील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. जिल्ह्यातील कौठा भागात झालेल्या सभेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधी दाखवतात ते लाल पुस्तक आतून कोरे असल्याची टीका केली होती. त्याचा संदर्भ घेऊन उत्तर देताना खासदार गांधी म्हणाले, मोदींनी संविधान वाचलेच नाही. जाहीर कार्यक्रमात ते संविधानाचा आदर करत असल्याचे दाखवतात. परंतु गुप्त बैठकीत संविधान कसे संपवता येईल, याचे षडयंत्र करत असतात, असा आरोप केला. आमच्याकडे विचारधारेची लढाई, संविधान, प्रेम, आदर, बंधुभाव आहे तर भाजपा व संघाकडे द्वेष, हिंसा, तिरस्कार व संविधानाचा सफाया हे उद्दिष्ट आहे. या लढाईत आता सर्वसामान्यांनी उडी घ्यावी. केवळ ९० अधिकारी देशाचे एकूण बजेट वितरीत करीत असतात. अदानीच्या कंपनीत महत्त्वाच्या पदांवर एकही दलित, आदिवासी आढळणार नाही. हे चित्र बदलण्याची गरज असल्याचे राहुल गांधी म्हणाले. २४ जणांना १६ लाख कोटी माफ, धर्माधर्मांत आणि जातीजातीत भांडणे लावायचे उद्योग भाजप व रा.स्व. संघ करीत असतो. मुंबई तील धारावी एक लाख कोटी रुपयांत अदानीला आंदण दिली आहे. तुम्ही गप्प कसे काय बसू शकता, असा प्रश्न उपस्थित करीत निवडणुकीत महायुतीचा पराभव करण्याचे आवाहन राहुल गांधींनी केले.



# भारताचे विद्यापीठ रमाई या महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव/प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे : धाराशिव येथे संपादक प्रा. डॉ. अशोक दवणे यांनी संपादित केलेल्या ३६९ कवीच्या रमाई वरील कवितांचं संपादन भारताचे विद्यापीठ रमाई या महाकाव्य ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झुंज वादळाशी या स्वकथना च्या लेखिका आशादेवी लस्करे या होत्या त्यांच्या हस्ते या संपादनाचे प्रकाशन करण्यात आले कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून गोवा इथून आलेल्या सुप्रसिद्ध साहित्यिक मंदाताई सुगीरे व वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्या विद्याताई वाघमारे या उपस्थित होत्या. त्यांनी या काव्यसंग्रहावर महत्वपूर्ण विचार मांडले खूप मोठ्या परिश्रमाने प्रा. डॉ. अशोक दवणे यांनी रमाई वरील कवितांचे संपादन करून खूप मोठा दस्तावेज वाचकास उपलब्ध करून दिल्याबद्दल अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी त्यांचे त्यांच्या भाषणात कौतुक केले.

या कार्यक्रमांमध्ये स्वरांजली इंगळे, विराज चंदनशिवे, चंदनशिवे नीलम ठोंबरे हे बालकांनी व प्रा. महेंद्र चंदनशिवे, विजय गायकवाड, धनराज सुगीरे यांनी आपले विचार व्यक्त केले या कार्यक्रमासाठी अनेक महिला उपस्थित होत्या त्यात लीना कांबळे, तनुजा कांबळे, शितल चंदनशिवे, सुजाता कांबळे, सुकुमार भिसे, रेणुका भिसे, वैशाली इंगळे, पद्मिनीबाई गायकवाड, या सर्व महिला उपस्थित होत्या. या महिलांच्या हस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशित करण्यात आले या काव्यसंग्रहामध्ये धाराशिव मधील पंडित कांबळे,अभिमन्यू इंगळे, व गोवा येथील मंदा सुगीरे यांच्या कविता आहेत. या कार्यक्रमासाठी रामजी कांबळे, सुमेध कांबळे, पि.के बनसोडे ,अण्णा गायकवाड, सुमेध,सुबोध, प्रतीक,व अनेक स्त्री-पुरुष यांनी उपस्थित राहून व सहभाग देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंडित कांबळे यांनी केले तर आभार अभिमन्यू इंगळे यांनी मांडले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### ‘थप्पड’ प्रकरणाने राजस्थानात तणाव; सरकारी कर्मचाऱ्यांचा संप

जयपूर : राजस्थानच्या टोंक जिल्ह्यात एका प्रशासकीय अधिकाऱ्याच्या कानशिलात लगावणाऱ्या अपक्ष उमेदवार नरेश मीणा याला पोलिसांनी गुरुवारी अटक केली आहे. थप्पड प्रकरणानंतर मीणा समर्थक आणि प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी निषेध आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला हिंसक वळण लागले. दरम्यान, मीणा यांच्या अटकेनंतर मतदारसंघातील सामरावता गावात उसळलेल्या हिंसाचारात पोलिसांच्या वाहनांसह सुमारे ६० दुचाकी आणि १८ चारचाकी गाड्यांची जाळपोळ करण्यात आली. देवळी-उनियारा विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत म तदानादरम्यान बुधवारी दुपारी नरेश मीणा यांनी मालपुराचे उपविभागीय दंडाधिकारी अमित चौधरी यांची कॉलर पकडत त्यांच्या कानशीलात लगावली होती. थप्पड प्रकरणानंतर सुरू झालेला तणाव बुधवारी रात्रभर आणि गुरुवारपर्यंत कायम होता. मीणा यांच्या अटकेसाठी ‘आरएएस असोसिएश’न आणि संबंधित सेवा अधिकाऱ्यांनी संप पुकारला. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्याबरोबर बैठक होईपर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवण्याचा पवित्रा कर्मचाऱ्यांनी घेतला होता. त्यामुळे राज्यातील सरकारी कार्यालयांतील कामकाजाला याचा मोठा फटका बसला. मीणा यांच्या अटकेनंतर संतप्त जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या.

# शाश्वत विकासासाठी संधी द्या, संधीचे सोने करून दाखवतो : अभिजीत पाटील

## उंबरे व रोपळे येथील जाहीर सभेत आश्वासन, आजपर्यंत जी जबाबदारी अंगावर पडली ती प्रामाणिकपणे पार पाडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : घरात कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना केवळ जनतेच्या अपार प्रेमामुळे ’विठ्ठल’चा चेअरमन झालो. या काळात ज्या-ज्या जबाबदाऱ्या अंगावर पडल्या, त्या सर्व प्रामाणिकपणे पार पाडल्या आहेत. इथून पुढच्या काळातही तुमच्यापुढे मांडलेले विकासाचे व्हिजन पूर्ण करण्यासाठी आणि मतदार संघाचा शाश्वत विकास करण्यासाठी संधी द्या, मिळालेल्या संधीचे सोने करून दाखवतो, असे आश्वासन महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी दिले.




बुधवारी अभिजीत आबा पाटील यांनी माढा मतदार संघास जोडलेल्या पंढरपूर तालुक्यातील कान्हापुरी, करोळे, जळोली, सांगवी, बादलकोट, नेमतवाडी, पेहे, नांदोरे, आव्हे, तरटगाव, या गावांचा प्रचारदौरा करून सायंकाळी उंबरे व रोपळे येथे जाहीर सभा घेतल्या. उंबरे येथील जाहीर सभेप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी जाधव साहेबांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो ज्येष्ठ नेते नामदेव बापू मुळे, विठ्ठल दादा दगडे ज्ञानेश्वरजी सलगर संभाजीराव कदम, सुरेशन इंगळे, शरद इंगळे, दादा इंगळे, सत्यवान मुळे, पांडूरंग शिंगटे, शेतकरी संघटनेचे सचिन पाटील, संभाजी ब्रिगेडचे किरण कचरे, नामदेव मुळे, विठ्ठल दगडे, किसन मुळे, विष्णू बागल, जीवराज चव्हाण, नागनाथ कानगुडे, शहाजी मुळे, सत्यवान मुळे, दत्तात्रय नरसाळे, किरण कचरे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक जनक भोसले, संजय विजय पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अभिजित आबांनी सांगितले की, एके काळी औदुंबर आण्णांनी उसाचा दर जाहीर केल्याशिवाय राज्यातील एकही कारखानदार दर जाहीर करत नव्हता. त्यांचाच एक छोटासा कार्यकर्ता म्हणून विठ्ठल सहकारी साखर कारखाना ताब्यात घेतल्यानंतर धाडसाने राज्यातील उसाच्या दराची कोंडी फोडली आणि तमाम शेतकऱ्यांना टनामागे साडेतीनशे ते चारशे रुपये जादा मिळवून दिले. परिणामी मागील तीन वर्षात शेतकरी संघटनांना एकही आंदोलन करावे लागले नाही. इथून पुढच्या काळात फूड प्रोडक्ट प्रकल्प उभारून उत्पादित मालाच्या निर्यातीतून शेतीकऱ्यांना परदेशी चलन मिळवून देऊ. सर्वात महत्वाचे म्हणजे सोलापूरसाठी समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्याने पुढील काळात उजनीतून नदीला नियमित पाणी सोडले जाणार नाही. ही बाब लक्ष्यात

### कोणाच्या वाळल्या पाचोळ्यावरही पाय दिला नाही : अभिजीत पाटील

घेऊन नदीवर ठिकठिकाणी दहा मीटर उंचीचे बंधारे बांधून पावसाळ्यात वाहून जाणारे २७ टीएमसी पाणी अडवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. याशिवाय राज्य आणि केंद्रशासनाच्या ९३६ योजना तळागाळापर्यंत पोचवणे, बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या व्यवसायांना चालना देणे, मतदार संघात सर्वच महापुरुषांचे पुतळे उभारणे, एमआयडीसीच्या माध्यमातून युवकांना रोजगार देणे, दोनच वर्षात सर्व रस्ते पक्के करणे, अशी अनेक विकासकामे करण्याचे आश्वासन त्यांनी दिले,

**यावेळी अभिजित आबा पाटील यांनी राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडल्याचे जनतेला अजिबात आवडले नसल्याने लोकसभेला महाविकास आघाडीचे बत्तीस खासदार निवडून दिल्याचे सांगून या विजयी खासदारांच्या कार्यक्षेत्रातील १९२ आमदार आघाडीचेच निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. त्यामुळे माढा मतदार संघाचा आवाज विधानसभेत घुमला पाहिजे, यासाठी निवडून देण्याचे आवाहन केले.**

माढा मतदार संघात ज्यांनी तीस वर्षे सत्ता भोगली आणि मागील पंधरा वर्षात पंढरपूर तालुक्यातील ४२ गावातील नेते व जनतेच्या पाठिंब्यावर निवडून आले त्या शिंदे परिवाराने आपल्या तालुक्यातील एकाही नेत्याचा कधी माढ्यात सत्कार करतानाचा फोटो आपल्याला पाहायला मिळाला नसल्याचे सांगून त्यानी फक्त मते घेतली पण मान दिला नाही, असे अभिजित पाटील म्हणाले.

# कर्जाळ येथे पंडित जवाहरलाल नेहरू, वस्ताद लहुजी साळवे जयंती निमित्त खाऊ वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ प्रतिनीधी : बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या संकल्पनेतून व समाजकल्याण सहा. आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पंडित जवाहर लाल नेहरू व वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंती निम्मित बार्टी मार्फत कर्जळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येते मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

तसेच सामाजकल्याण व बार्टी मार्फत चालविणाऱ्या विविध योजनाची माहिती तालुकेचे समतादूत नालंदा शिंदे यांनी दिली.

यावेळी जिल्हा परिषद शाळेतील कोळी रमेश (मराठी शाळा) सुवर्णा पाटील मॅडम (कन्नड शाळा)



उर्दू शाळा अंजुम आरा शेख मॅडम रईसा खान मसरत गौर, वसिमुन्निसा शेखशिक्षक वर्ग व विध्यार्थी उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतली मतदान जनजागृतीची शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती करण्याची शपथ घेतली.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाने आम्ही मतदान जनजागृती करणार हा उपक्रम आयोजित केला होता. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे उपस्थित होते.

भारताची लोकशाही मजबूत करण्यासाठी व मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आम्ही मतदान करणार आणि नागरिक, महिला,




युवक,युवती यांना देखील मतदान करण्यास प्रवृत्त करणार अशी शपथ उपस्थित विद्यार्थ्यांनी घेतली. शहर व ग्रामीण भागातील सुजाण नागरिक महिला युवक, युवती यांनी मतदान करावे, यासाठी प्रबोधन करत स्वयंसेवक गावोगावी फिरणार आहेत. मतदान जागृती

### राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचा उपक्रम

प्रबोधनाची चळवळ गतिमान करणार आहोत. असे यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा राजेश पवार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा राजेश पवार यांनी केले, सूत्रसंचलन प्राध्यापिका हर्षदा गायकवाड यांनी केले तर आभार विद्यार्थी समर्थ पवार यांनी मानले. संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी विद्यापीठ रा से यो संचालक डॉ राजेंद्र वडजे,संचालक मल्लिकार्जुन मसुती, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, माजी प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

# हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारार्थ इंदापूर शहरातील महिलांच्या पदयात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी, अतुल सोनकांबळे : जिजाऊ फेडरेशनच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील आणि माजी जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील ठाकरे यांच्या समवेत महिलांनी महिला सक्षमीकरणाचा नारा देत साधला इंदापूरकरांशी संवाद

महाविकास आघाडीचे विधानसभेचे उमेदवार मा. मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या प्रचारार्थ जिजाऊ फेडरेशनच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील व माजी जिल्हा परिषद सदस्या अंकिता पाटील ठाकरे यांच्या समवेत महिलांनी पदयात्रेमध्ये उस्फूर्त सहभाग नोंदवीत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना विधानसभेत मोठ्याधिक्याने मतदान करून निवडून देण्याचे आवाहन करीत पदयात्रेच्या माध्यमातून नागरिकांशी त्यांनी संवाद साधला.

महिलांची संख्या मोठी असून त्यांची सुरक्षितता आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी देशाचे नेते शरद पवार आणि हर्षवर्धन पाटील यांना जनतेने साथ द्यावी यासाठी महिलावर्गाने मोठ्या प्रमाणात सहभागी होत या यात्रेमध्ये इंदापूर शहरातील नागरिकांशी त्यांनी संवाद साधला तसेच यावेळी त्यांनी हर्षवर्धन पाटील यांना मतदान करण्याचे आवाहन केले.

यावेळी अनेक कार्यकर्ते यात्रेत सहभागी झाल्याने पदयात्रा मोठी होऊन इंदापुरात निवडणुकीचे मोठे वातावरण तयार झाले होते सर्वत्र तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांच्या घोषणा सर्वत्र दुमदुमत होत्या.




## दिनेश पंचभाई यांचे प्रतिपादन

## महामानव भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण

# बाबासाहेब आंबेडकर यांची आठवण करून मतदान करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : १९५२-५४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जनतेने दुर्लक्षित करुन मतदान केले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पाडण्याची भूमिका मात्र डाव्या पक्षाच्या मनुवादी लोकांनी केले. अशी चूक करू नका बाबासाहेब आंबेडकर यांच्या नातवंडाच्या पक्षाचे वंचित बहुजन आघाडी लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवडणुकीचा बदला घ्यावा. असी मी अपेक्षा व्यक्त करतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आठवण करून मतदान करा. असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे उमदेवार यांनी केले.



यावेळी विधानसभा मतदारसंघ अर्जुनीमोरगांव क्षेत्राचे प्रचार सभा दरम्यान तालुकाध्यक्ष कैलास ईस्कापे, सरचिटणीस संदीप नंदागवळी, दिपक तागडे, कृपाल बोरकर, नरेश गोंडाणे, खोब्रागडे आदी स्टार प्रचारक म्हणून तडफदार प्रचार सभा गाजवला. तसेच विधानसभा प्रमुख व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महामानव भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून अभिवदन करण्यात आले. याप्रसंगी पदाधिकारी यांनी अभिवादन केले. यावेळी अर्जुनीमोरगांव विधानसभा संपूर्ण पिंजून काढला, या दिवशी तब्बल १०-१५ गावात जावून मतदारांचे मत जागृत केले.

यावेळी युवा वंचित बहुजन आघाडीचे रोहित रामटेके, विश्वरत्न रामटेके, दिपेंद्र ऊके, आदी प्रचार करत होते.

# कोठुरे विद्यालयात कर्मवीर डी. आर. भोसले यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कोठुरे येथील स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयामध्ये शिक्षणप्रेमी कर्मवीर डी.आर.भोसले यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजीराव सानप होते.तर व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक नितीनकुमार सावकार, गौतम जाधव, संजय निकम, सुधाकर निकम उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली असून व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर डी. आर भोसले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात सानप म्हणाले नाशिक जिल्ह्यात खेड्यापाड्यात बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविण्याचे काम मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने केले.संस्थेने आपल्या कार्याने फक्त नाशिक जिल्ह्यातच नाही तर महाराष्ट्रातही आपला नावलौकिक निर्माण केला असून आज संस्थेच्या कार्याचे डेरेदार वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या कार्यास अनेक कर्मवीरांचे हात लागले आहे त्यापैकी एक म्हणजे कर्मवीर डी.आर.भोसले त्यांनी शिक्षण प्रचार- प्रसार, सहकार चळवळ, शेतकऱ्यांचे प्रबोधन, गोरगरीब व गरजूंना सातत्याने मदत अशा विविध प्रकारच्या कार्यामध्ये आयुष्यभर भरीव काम करत समाजसेवा केली. अनेक लोकांना सहकाराचे महत्व पटवून देऊन बहुजन समाजाच्या हितासाठी त्यांनी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या. मविप्र संस्थेने त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून निफाड तालुक्यातील देवगाव येथील शाळेला नाव दिले .. कर्मवीर डी.आर.भोसले यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर निकम यांनी केले. तर आभार किरण भडांगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### सायबर फसवणूक करणाऱ्यांना मदत केल्याप्रकरणी आठ जणांना अटक

मुंबई : कोणत्याही कागदपत्राशिवाय मोबाइल पोर्ट करून सायबर फसवणूक करणाऱ्यांना मदत केल्याप्रकरणी आठ आरोपींना अटक करण्यात मध्य प्रादेशिक सायबर पोलिसांना यश आले आहे. आरोपी मोबाइल कंपन्यांतील कर्मचारी व दुकानदार आहेत. ५१ लाख रुपयांच्या सायबर फसवणुकीप्रकरणी पोलिसांनी ही कारवाई केली. महादेव कदम, रोहित यादव, सागर ठाकूर, राज आर्डे, गुलाबचंद जैस्वार, उस्मान अली शेख, अब्बुबकर युसूफ व महेश पवार अशी अटक करण्यात आलेल्या आरोपीची नावे आहेत. आरोपींनी सायबर फसवणुकीसाठी कोणतीही केवायसी कागदपत्रे न घेता केवळ यूपीसी कोडद्वारे मोबाइल क्रमांक पोर्ट केले. त्यानंतर त्याचा वापर सायबर फसवणुकीसाठी करण्यात आला. शेअर बाजारातील गुंतवणूकीपासून इतर सायबर फसवणुकीसाठी या क्रमांकाचा वापर करण्यात आला. गेल्या एका वर्षात त्यांनी परदेशी नागरिक, तसेच इतर व्यक्तींना ३० हजार सीमकार्ट विकल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

# डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विजयासाठी सांगोल्यात पदयात्रा

## पदयात्रेस तरुणांसह महिला भगिनीचा उत्स्फुर्त प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या विजयासाठी सांगोल्यात भव्य पदयात्रा संपन्न झाली. पदयात्रा मार्गस्थ होताना डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख यांचे ठिकठिकाणी पुष्पहार घालून स्वागत करुन मतदारांनी त्यांना विजयाचा आशीर्वाद दिला.सांगोला शहरात पदयात्रेदरम्यान सर्व ठिकाणी महिला भगिनींनी औक्षण केले. सर्वच सम ाजबांधवांकडून डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख यांचे जंगी स्व-ागत करण्यात आले.तर विकासाची दृष्टी असलेले डॉ.बाबासाहेब देशमुख यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्पदेखील यावेळी करण्यात आला.

सकाळी ९.३० वाजता वाजता तेली गल्ली येथील अंबिका मंदिरापा-सून हलगीच्या निनादात ही भव्य पदयात्रा निघाली. सदरची पदयात्रेची सुरुवात तेली गल्ली येथील श्री अंबिकादेवी मंदिरापासून करण्यात आली. पदयात्रा तेलीगल्ली, दक्षता हॉस्पीटल समोरुन बुरुडगल्ली, बव्राबादपेठ, इंदिरानगर, संजयनगर, ढेरे वसाहत, धनगर गल्ली, सनगर गल्ली, साठे नगर, भीमनगर या परिसरातून काढण्यात आली.यावेळी निवडून निवडून येणार कोण, बाबासाहेबांशिवाय दुसरे कोण, हवा कुणाची, बाबासाहेबांची, डॉ.बाबासाहेब देशमुख तुम आगे बडो, हम तुम्हारे साथ है, एकच साहेब बाबासाहेब व डॉ.बाबासाहेब देशमुखांचा विजय असो अशा घोषणा या पदयात्रेत सहभागी मतदारांनी दिल्या.डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे निवडणूक चिन्ह असलेले शिट्टी गळ्यात घालून लाल टोपी, लाल उपरणे परिधान केलेले कार्यकर्ते पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पद यात्रा कालावधीत संपूर्ण शहरात शिट्टीचा आ-वाज मोठा घुमत होता.

ठिकठिकाणी मतदार व कार्यकर्त्यांनी फटाक्याच्या आतिषबाजीत जंगी स्वागत केले. या मतदारांना डॉ.बाबासाहेब देशम ुख व डॉ.अनिकेत देशमुख यांनी मतदारांना हात उंचावून अभिवादन केले. त्यांच्या आवाहनाला मतदारांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यकर्त्यांनी अनेक मतदारांच्या घरी जाऊन त्यांना डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे माहितीपत्रक देऊन शिट्टी या निवडणूक चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या पदयात्रेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते बाबुराव गायकवाड, दत्ता सावंत, महेश नलवडे यांच्यासह शेतकरी कामगार पक्षा-चे व मित्रपक्षाचे पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.प्रचार, पदयात्रा, बैठका, सभा, माहितीपत्रके, सोशल मीडिया, वृत्तपत्र या माध्यमातून डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे शिट्टी हे हे निवडणूक चिन्ह मतदारसंघातील घरोघरी पोहोचले आहे.

डॉ.बाबासाहेब देशमुख हे गेल्या तीन वर्षापासून सामाजिक काम करतात. अनेक गरीब व कष्टकरी लोकांना त्यांनी मदत केली आहे. मुस्लिम असो किंवा हिंदू असो किंवा आणि कुठल्याही धर्माचा व्यक्ती असो सर्वांना आपला माणूस म्हणून त्यांनी मदत केली आहे. त्यामुळे डॉ.बाबासाहेब देशमुख यांना सांगोला शहरातून मोठे मतदान होईल असे सर्वच नागरिकांमधून सांगण्यात आले.

> **निवडणुकीचे रणधुमाळी सुरू झाल्यापासून सांगोला तालुक्यात दमदाटीचे राजकारण सुरू आहे. ग्रामीण भागात आबासाहेबांचे किंवा माझे, अनिकेतचे फोटो स्टेटसला ठेवल्यावरती फोन करून डिलीट करायला सांगण्यात येत असून शेवटच्या जाहीर सभेत असेच एक कॉल रेकॉर्डिंग सर्वांना ऐकवणार आहे. येणाऱ्या चार ते पाच दिवसांत शेकापच्या कार्यकर्त्यांसोबत वादविवाद करून भांडणे करण्यासाठी प्रयत्न केले जातील परंतु विधानसभेची निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी शेतकरी कामगार पक्ष व मित्र पक्षाच्या सर्वच पदाधिकारी कार्यकर्त्यांना सूचना केल्या आहेत.**
>
> **– डॉ.बाबासाहेब देशमुख**

# निवडणूक कर्तव्यात कसूर; महसूल सेवक परमेश्वर राठोड निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम दिनांक १५/१०/२०२४ रोजी प्रसिद्ध झाला असून राज्यात आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. त्या अनुषंगाने दिनांक १२/११/२०२४ आणि १३/११/२०२४ रोजी मतदान यंत्र सिलिंग च्या कामकाजासाठी श्री. परमेश्वर राठोड, महसूल सेवक तहसील कार्यालय देऊळगाव राजा यांचा आदेश निर्गमित करण्यात आला होता त्यानुसार श्री राठोड हे निवडणूक कर्तव्यावर हजर राहणे अपेक्षित होते परंतु ते उक्त नमूद दिनांकास कार्यालयाला कोणतीही पूर्व सूचना न देता गैरहजर राहिले असल्यामुळे तसेच त्यांना भ्रमणध्वनी वरून वारंवार संपर्क केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही यावरून त्यांनी निवडणूक कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचे दिसून आल्यामुळे मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या आदेशाने आज दिनांक १४/११/२०२४ रोजी निलंबित करण्यात आले आहे.

श्री राठोड यांनी निवडणूक विषयक अत्यंत महत्वाच्या कामकाजात जाणीवपूर्वक निष्काळजीपणा आणि कसूर केल्याचे सकृतदर्षनी निदर्शनास आले असल्याने व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणूक) नियम १९७९ चे नियम ३ चा भंग केलेला आहे आणि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम क्रमांक ४ अन्वये श्री राठोड यांना या आदेशाच्या दिनांकापासून शासन सेवेतून निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर निलंबन कालावधीमध्ये श्री राठोड यांचे तहसील कार्यालय देऊळगाव राजा हेच मुख्यालय असेल.

# अनिल सावंत यांची भालके-आवताडे यांच्यावर टीका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माजी आमदार यांच्या जीवावर गेल्या पोट निवडणुकीमध्ये ते आमदार झाले आहेत. एक आपल्या वडिलांच्या जीवावर राजकारणात यशस्वी होण्याचे देवा स्वप्न पाहत आहेत.

विदमनामदार सांगतात तीन हजार कोटीची कामे केली मात्र पंढरपूर मंगळवेढा अनेक गावात पायाभूत सुविधांची देखील सोय नसल्याचे दिसत आहे मग नक्की तीन हजार कोटी कोटी कॉन्टॅक्टर यांचे लोक असल्यावर तीन हजार कोटी फक्त कागदावरच दिसणार नाही का खरमरीत टीका महाविकास आघाडीचे आणि शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांनी समाधान आवताडे आणि भगीरथ बालके यांच्यावर टीका केली आहे. पंढरपूर मंगळवेढा विधान विधानसभेचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांनी आज प्रचारार्थ पंढरपूर तालुक्यातील गावांना गाव भेट दौरे आयोजित केला होता त्यामध्ये सिद्धेवाडी ता-वशी तनाळी तपकिरी शेटफळ खर्डी या गावांचा समावेश होता सिद्धेवाडी गावांमध्ये दिलेल्या भेटीत उपस्थित म तदारांनी बोलताना अनिल सावंत यांनी

सांगलीचे खासदार विशाल पाटील यांचा चांगला समाचार घेतला आणि विशाल पाटलांना टिकेला उत्तर देताना अनिल चव्हाण यांनी काल आपल्या एका मित्र पक्षाचे उमेदव-ारी सभा झाली असे त्यांनी सांगितले.

# कारेगाव येथे क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : लोहा तालुक्यातील कारेगाव येथे लहुजी साळवे यांच्या २३० व्या जयंतीनिमित्त समस्त मातंग समाजाच्या वतीने अभिवादन करण्यात आले आहे.

उपस्थित जयंती मंडळाचे अध्यक्ष शरद तुकाराम वाघम ारे, उपाध्यक्ष अवधूत हरी गायकवाड, सुरेश हरी, राम हरी गायकवाड, मारुती भुजंगा वाघम ारे, शिवाजी वाघमारे, पत्रकार रावण वाघमारे, कारेगावातील सर्व महिला व समाज बांधव.

# 'शब्द माझे तुझ्याचसाठी' काव्यसंग्रह आणि 'मयूरस्पर्श' चारोळी संग्रह प्रकाशन सोहळा थाटात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल/प्रतिनिधी : सर्वपरिचित कवयित्री, समाज कार्यकर्त्या सौ. अश्विनी सचिन बोलके यांच्या 'शब्द माझे तुझ्याचसाठी' या काव्यसंग्रहाचे आणि निवेदक, गायक अभियंता कवी मयूर महादेव पालकर यांच्या 'मयूरस्पर्श' चारोळी संग्रहाचे प्रकाशन अभियंता भवन नवीन पनवेल येथे दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी ज्येष्ठ साहित्यिक - सुप्रसिद्ध गझलकार ए.के. शेख तसेच प्रमुख म ान्यवर म्हणून अखिल भारतीय साहित्य परिषद कोकण प्रांत अध्यक्ष - ज्येष्ठ पत्रकार श्री. दुर्गेश सोनार, कवयित्री, शिक्षिका सौ.मानसी नेवगी, साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे आणि सबोर्डीनेट इंजिनीअर असोशिएशनचे अध्यक्ष संजय ठाकूर अशा दिग्गज मान्यवरांच्या आणि आप्तेष्ट व कुटुंबियांच्या उपस्थितीत थाटात संपन्न झाला. दुर्गेश सोनार यांनी कवयित्री अश्विनी बोलके यांच्या 'शब्द माझे तुझ्याचसाठी' या पुस्तकाबद्दल, या काव्यसंग्रहातील कविता सकस, सशक्त आणि सामर्थ्यशाली आहेत तसेच हा काव्यसंग्रह असला तरी संपूर्ण पुस्तक वा-चून पूर्ण व्हायला दोन ते तीन महिने लागू शकतात,इतक्या त्या विचार करायला लावणाऱ्या आहेत. असे बोल व्यक्त केले. मनास होणारा भावनांचा तरल स्पर्श म्हणजे मयूरस्पर्श, अशा शब्दांत कवयित्री मानसी नेवगी यांनी चारोळीकार मयूर पालकर यांच्या 'मयूरस्पर्श ' विषयी आ-पले मनोगत व्यक्त केले.जेष्ठ साहित्यिक आणि सुप्रसिद्ध गझलकार सन्माननीय ए. के . शेख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कवयित्री अश्विनी बोलके आणि कवी मयूर पालकर यांच्या साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि 'शब्द माझे तुझ्याचसाठी' आणि 'मयूर-स्पर्श' या पुस्तकांचे प्रकाशन झाले असे जाहीर केले. उत्तोमत्तम कथा कवितासंग्रह निर्माण करणाऱ्या साहित्यसंपदा प्रकाशनची ही दोन्ही पुस्तके आहेत.

सौ. पल्लवी काळे यांनी अश्विनी बोल-के यांच्या काव्यसंग्रहातील 'ऋणानुबंध' या कवितेचे वाचन केले. शब्दशिल्प कलाविष्कार संघ सर्वेसर्वा हिरकणी गीतांजली वाणी यांनी दोन्ही पुस्तकांच्या शेकडो आवृत्त्या प्रकाशित होवोत अशा शुभेच्छा दिल्या व मयूर पालकर हे आधुनिक युगातील परिपक्व कवी आहेत, भविष्यात त्यांच्या साहित्यिक संपदेची खास आवड असणारे वाचक असतील असे त्या म्हणाल्या. शुभंकरोती साहित्यिक संस्था संस्थापक कवयित्री सोनाली जगताप यांनी दोन्ही पुस्तके आवर्जून वाचण्यासारखी आहेत असे सांगितले तर कवयित्री प्रियांका कोठावदे, रजनी येवले यांनी मयूरस्पर्श मधील काही चारोळ्यांचे वाचन केले. साहित्य संपदा संस्थेतर्फे शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या शिक्षिकांना 'शिक्षक रत्न' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता हर्डीकर ह्यांनी करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.सचिन बोलके ह्यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम ाची सांगता झाली.

## नळदुर्ग येथे भाजप महायुतीच्या जाहीर सभेला प्रचंड प्रतिसाद

## शिवसेनेने भुमिपुत्रास उमेदवारी न दिल्याने स्थानिकांनी व्यक्त केला रोष

# सर्वोच्च खंडपिठाने दिलेल्या निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेतील मुलभुत तत्व बदलू शकत नाहीत : मा. ना. नितीन गडकरी






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/प्रतिनिधी, दादासाहेब बनसोडे : राष्ट्राची एकता आणि एकात्म ता जोपासण्यासाठी किंवा लोकशाही बळकट करण्यासाठी निश्चितपणे सर्वोच्च खंडपीठाने दिलेल्या निर्णया नुसार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारतीय संविधानातील मुलभुत तत्व कधीच बदलू शकत नाहीत हे आम्ही ठाम पणे सांगतो परंतू कॉग्रेस वाल्यानी भारतीय संविधाना विषयी नागरीकांच्या मनात विष पसरविण्याचे काम करत आहेत आशा भुल थापा मारणाऱ्या कॉग्रेसला चांगलाच धडा शिकवला पाहिजे. कारण भारतीय राज्य घटनेने दिलेले मुलभुत अधिकार किंवा तत्व आपण कधीच विसरू शकत नाहीत मुलभुत तत्व कोणते सार्वभौम, लोकतंत्र, सम ाजवाद धर्मनिरपेक्ष, अभिव्यक्ती हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधांना माध्यमातुन दिलेले अधिकार आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते नॉलेजला खुच महत्व आहे जो शिकेल तोच जगेल आशा शब्द-ात उपदेश बाबासाहेबानी दिले तोच उपदेश भाजप आणि महायुती सरकार त्यांचे तत्व पाळतोय आसे परखड मत भारताचे वाहतूक व परिवहन केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी केले.

नळदुर्ग येथे नुकताच भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्राचारार्थ केंद्रिय मंत्री मा ना नितीनजी गडकरी यांची जाहीर सभा घेण्यात आली त्यावेळेस ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले कोणत्या महाप-ुरुषाला जात होती कोणत्या संताला किंवा पंथाला जात होती कोणत्या धर्मात जात होती का मग कशा करिता जातीचे राजकारण करू पाहाताय आशा जातीच्या समीकरणाला भाजप महायुतीने कधीच मुठमाती दिली आहे . शिवाय तुळजापूर ते नळदुर्ग हायवे रोडला चौवपदरी करणाला प्रशासकीय मंजुरी मिळाली आसुन निवडणूक संपताच या कामाला सुरुवात घेण-ार आहे . या भाजप महायूती च्या काळात रस्ते विकास जोडणी प्रकल्प संपुर्ण देशात राबविण्यात आला जनतेसाठी अनेक योजना राबविल्या जातात महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला शिवाय माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आशा अनेक योजना राबवित भारत देश सुजलाम सुफलाम करायचा आहे त्यासाठी मतदारांच्या सकारात्मक प्रतिसाद मिळाला पाहिजे महायुतीचे अधिकृत उमेदवार राणा जगजितसिंह पाटील आहेत यांना भरभरून आशिर्वाद देऊन प्रचंड मतानी विजयी कराल आशी आपेक्षा करतो आसे म्हणाले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील, नेते सुनिल मालक चव्हाण, भाजपा-चे नेते नितीनजी काळे, यूवा नेते मल्हार पाटील, भाजपाचे धाराशिव, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य , गणेश सोनटक्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मितताई कांबळे, रि पा इं चे नेते राजाभाऊ ओव्हाळ, गोकुळ तात्या शिंदे, शिवसेनेचे ज्ञानेश्वर घोडके, भाजपाचे नेते संतोष बोबडे, रि पा इं चे बाबासाहेब बनसोडे, रि पा इंचे एस के गायकवाड, लहुजी शक्तीसेनेचे शिवाजी गायकवाड, नप चे माजी उपाध्यक्ष शफी भाई शेख, सज्जनराव साळुंके, भिमा इंगोले, प्रभाकर मुळे, मिलींद पाटील, विनायक अहंकारी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवदास गुरुजी कांबळे, विक्रम देशमुख, निहाल काझी, धनंजय शिंगाडे, भाजपचे नेते सुशांत भुमकर, माजी प्रभारी नगराध्यक्ष नय्यर जागीरदार, माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे, माजी नगरसेवक सुधिर हजारे , सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव , शहराध्यक्ष धिमाजी घुगे, यूवा नेते पद्माकर घोडके, सागर हजारे, यूवा नेते बबन चौधरी, संजय बताले, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव वडगावे, दिपक घोडके सचिन पाटील, नारायण नन्नवरे, विक्रम देशमुख जिल्हा परिषदेचे माजी सदस्य महेंद्र काका धुरगुडे, श्रमिक पोतदार, सह हजारो नागरिक जाहीर सभेला उपस्थित होते.